I O / प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण
**P.S.(ठाणे):** वैजापूर
**Year (वर्ष):** 2025
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0199
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/04/2025 19:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/04/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/04/2025
**Time From (वेळेपासून):** 15:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:38 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/04/2025
**Time (वेळ):** 19:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/04/2025 19:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** आनंद हस्पीटल समोरील नाथकपा क

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):
   (a) **Name** (नाव): दत्तु रघुनाथ ठोंबरे
   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000
   (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
   **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राभायगांव, तावैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राभायगांव, तावैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

   (i) **Occupation** (व्यवसाय):
   (j) **Phone number** (फोन नं.):
   **Mobile** (मोबाइल नं.): 91-9766954502

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमिता सुरेशराव लंगडे | | | 1. भायगांव, तावैजापूर,वैजापूर, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रोख रक्कम अँन्थ्रसीन पावडर लागलेली 2500 रु व एक लेडीज पर्स | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी दत्तु रघुनाथ ठोंबरे, वय 25 वर्ष, व्यवसाय शेती, रा.भायगांव, ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर, मो.नं.
9766 954502.
मी वरील प्रमाणे असुन, दि.21/04/2025 रोजी पोलीस निरीक्षक विजय वगरे साहेब यांचेकडे दोन पंचासमक्ष
माझ्याकडे होत असलेल्या पैसे मागणीची तक्रार दिली की, माझे आजोबा देवराव दशरथ ठोंबरे, आजी काशाबाई
देवराव ठोंबरे, वडील रघुनाथ देवराव ठोंबरे हे मयत असुन माझे आजोबा देवराव दशरथ ठोंबरे यांचे नावे भायगांव
शिवार शेत गट नं. 16 मध्ये 95 आर शेत जमीन आहे.
माझे आजोबा, आजी, वडील हे मयत झालेले असल्याने माझ्या आजोबाच्या नावे असलेली वरील शेत जमीन ही
माझ्यासह माझे चुलते रामदास देवराव ठोंबरे, कैलास देवराव ठोंबरे, माझी आई शकुंतला रघुनाथ ठोंबरे यांच्या
नावाने वरील जमीन वारस हक्काने नावाची नोंद घेऊन 7/12 मिळावा यासाठी मी काल दि.20/04/2025 रोजी
दुपारी 1 वाजेच्या सुमारास आमच्या भायगांव सज्जाच्या तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना माझ्या फोनवरुन फोन
केला त्यावेळी तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांनी दि.21/04/2025 रोजी सर्व कागदपत्रासह 3,000/- रुपये घेऊन
वैजापूरला माझ्याकडे या असे सांगितले. त्यावेळी नाईलाजास्तव ठिक आहे असे म्हणलो.
मला माझ्या वरील कामासाठी तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना पैसे दयायची इच्छा नसल्याने आज दि.
21/04/2025 रोजी मी ऍन्टी करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर येथे फोन करुन मला वरील प्रमाणे होत
असलेल्या पैशाच्या मागणी बाबत तक्रार केली. त्यानंतर थोडयाच वेळात पोलीस निरीक्षक श्री.विजय वगरे ऍन्टी
करप्शन ब्युरो, छत्रपती संभाजीनगर यांचा मला फोन आला त्यावेळी मी त्यांना माझी वरील तक्रार फोनवर सांगितली
व माझ्याकडे वेळ नसल्याने मी पुढील कारवाईसाठी वगरे साहेबांना वैजापूरला येण्याची मी विनंती केली.
त्याप्रमाणे पो.नि.विजय वगरे साहेब हे दोन शासकीय पंच त्यात एक महिला पंच व एक पुरुष पंच व त्यांचे टीमसह
वैजापूर गावात सुरक्षित ठिकाणी हजर आले त्यावेळी मी त्यांचेजवळ माझ्या मोटार सायकलने गेलो. त्यावेळी पोनि
विजय वगरे साहेब, दोन्ही पंच, टिम मधील सर्वांचा आमचा एकमेकांचा परिचय झाला. त्यावेळी मी माझी वरील तक्रार
सर्वासमक्ष तोंडी सांगितली त्यानंतर वगरे साहेबांनी ती मला लेखी लिहण्यास सांगितली त्यावरुन माझी लेखी तक्रार
देत आहे की, माझ्या आजोबाच्या नावे असलेली भायगांव शिवार शेत गट नं.16 ही जमीन माझ्यासह माझे चुलते
रामदास देवराव ठोंबरे, कैलास देवराव ठोंबरे, माझी आई शकुंतला रघुनाथ ठोंबरे यांच्या नावाने वारस हक्कात नोंद
घेऊन 7/12 मिळावा यासाठी तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना 3,000/- रुपये देण्याची इच्छा नाही.
तरी आमच्या भायगांवच्या तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांनी माझ्या वरील कामासाठी 3,000/- रुपये व कागदपत्र
घेऊन आज रोजी भेटायला बोलविले आहे. मी आज रोजी तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना भेटायला जाणार आहे.
माझेत व त्यांचेत पैशाचा देण्याघेण्याचा, उसणवारीचा व्यवहार नाही., वैरदुश्मनी नाही. त्यांनी किंवा त्यांच्या मार्फतीने
इतर कोणी माझ्याकडे माझे वरील कामासाठी पैशाची मागणी केल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कार्यवाही
होणेस विनंती आहे.
माझ्या वरील तक्रारीवरुन पो.नि.वगरे साहेब व दोन्ही पंच व त्यांच्या टिमने मी दिलेल्या तक्रारी मधील तलाठी
श्रीमती लंगडे मॅडम यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यानंतर मला, दोन्ही
पंच, सापळा पथकाला पो.नि.विजय वगरे यांनी लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाई बाबत सर्व प्रक्रीयेची
माहीती देऊन समजावुन सांगितले. व लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर
मध्ये पंचासमक्ष नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर लपवुन दिला. व पंच क्र.1 यांना
माझ्या सोबत देऊन माझ्याकडील मोटार सायकलने लाचमागणी पडताळणीसाठी दि.21/04/2025 रोजी दुपारी
02.07 वा. पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना भेटण्यासाठी फुलेवाडी
रोडने जात असताना श्रीमती लंगडे मॅडम यांना फोन केला तर त्यांनी आनंद हॉस्पीटल समोरील नाथकृपा किरणा

दुकानाच्या बाजुने आतमध्ये हिरवी नेट लावली आहे ते माझे घर आहे तेथे या असे म्हणल्यामुळे मी व पंच क्र.1 तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचे घरी गेलो. तेथे त्यांची भेट झाली त्यांचे सोबत इतर एक महिला मॅडम हजर होती. त्यावेळी मी त्यांना माझ्या आजोबांच्या नावे असलेल्या शेत गट नं.16 मधील शेत जमीन ही माझे आजोबा, वडील मयत असल्याने त्या जमीनीत माझ्यासह, माझे दोन चलुते, आई यांचे नावे वारसा हक्काने नोंद करण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी माझ्याकडील कागदपत्राची पाहणी केली व त्यानंतर एक अर्ज आणण्यासाठी सांगितला. त्यानंतर मी वारस हक्कात नोंद घेऊन 7/12 देणे बाबतचा पिवळया रंगाचा अर्ज पंच क.1 यांचेसह झेरॉक्सवरुन घेऊन तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचेकडे गेलो. त्यावेळी त्यांनी माझ्याकडील अर्जावर माझी सही करुन घेतली व सोबतच्या कागदपत्राच्या पाठीमागे माझे नांव व मोबाईल नंबर लिहण्यास सांगितले. त्यानंतर माझे वारस हक्काचे नावाची नोंद झाल्यास मला व्हॉटसअपवर फोटो पाठविते असे म्हणल्या त्यावेळी मी त्यांना येऊ का मॅडम असे बोललो त्यावेळी त्यांनी हो असे म्हणुन माझी फिस नंतर दयाल का त्यावेळी मी काय असे बोललो तर त्यांनी फीस म्हणलं नंतर दयाल त्यावेळी मी फिस किती हाय असे बोललो तर त्यांनी तीन हजार असे बोलल्या. त्यावेळी मी तीन हजार, थोडी कमी करा ना त्यांनी बोलल्या कमीच सांगितली त्यावेळी मी आता ते नेमकं दोघं जण पैसे देणार नही हे मला, ते दोघं पैशे देणार नही हे, मी अडीच हजार रुपये देतो तुम्हाला नही तं दोन हजार रुपये देतो ना तुम्हाला असे बोललो त्यावेळी त्यांनी आडीच दया असे म्हणुन आडीच हजार रुपये घेऊन येण्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे वगरे साहेबांकडे परत आलो. माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व त्यानंतर पंच क्र.1 व मला विचारपुस केली. व त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधील माझे व तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचेतील संभाषण आम्ही सर्वांनी ऐकले.

त्यानंतर सापळा कारवाईच्या अनुषंगाने पोनि वगरे साहेबांनी मला, दोन्ही पंच, सापळा पथकाला परत सुचना दिल्या ॲन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करुन दाखविले व त्यानंतर मी हजर केलेल्या 500/- रु.दराच्या 5 नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेऊन त्या लाचेच्या नोटांना ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्या अंगातील पॅन्टचे उजवे बाजुचे समोरील खिशात लाचेची रक्कम ठेवुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगातील शर्टाचे डावे बाजुचे वरचे खिशात ठेवुन दिला. त्यानंतर पंच क्र.1 यांना माझ्या सोबत देऊन लाचेची रक्कम तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना देण्यासाठी दि. 21/04/2025 रोजी 03.20 वा. माझ्याकडील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणाहुन रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे फुलेवाडी रोडने आनंद हॉस्पीटल समोरील नाथकृपा किरणा दुकानाच्या बाजुने आतमध्ये हिरवी नेट लावली आहे तेथे तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचे घरी गेलो. तेथे तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना पिण्यासाठी मी पाणी मागीतले त्यांनी पाणी पिण्यास दिले त्यानंतर मी त्यांना माझ्या वारस हक्काच्या कामात आडचण तर येणार नाहीना असे बोललो त्यावेळी त्यांनी कांही आडचण येणार नाही असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैशाची मागणी केली त्यावेळी मी माझ्या अंगातील पॅन्टच्या उजवे बाजुचे समोरील खिशातुन लाचेची रक्कम 2500/- रुपये काढुन तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचे समोर धरल्या त्यावेळी त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने घेऊन दोन्ही हातांनी मोजुन 2500/- रुपये असल्याची खात्री केली. त्यानंतर त्या मागच्या रुममध्ये जाऊन त्यांनी त्यांची ग्रे कलरची लेडीज पर्स आणली व त्यात त्यांनी मी दिलेली लाचेची रक्कम 2500/- रुपये ज्यात ॲन्थ्रॉसीन पावडर असलेली ठेवली. त्यावेळी मी त्यांना किती दिवस लागल असे विचारले तर त्यांनी दहा मे च्या अगोदर करु असे म्हणुन काम झाल्यास मला कळविते असे बोलल्या त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सदर घराचा जिना (पायऱ्या) उतरुन खाली रोडवर येताच लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा म्हणुन मी माझ्या अंगातील पॅन्टच्या डाव्या बाजुचे समोरील खिशातुन पांढरा हात रुमाल काढुन तोंड पुसल्या सारखे केले. ती वेळ 03.35 वाजेची होती.

त्यानंतर तात्काळ लगेचच पोनि वगरे साहेब पंच क्र.2 श्रीमती सारीका पायगव्हाण यांचेसह सापळा टीम मधील सर्व सदस्य तात्काळ घटनास्थळी आले व त्यांनी तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांना त्यांचा परिचय करुन दिला व त्यांचे नांव विचारता त्यांनी त्यांचे नांव सौ.अमिता सुरेशराव लंगडे, वय 37 वर्ष, व्यवसाय- नोकरी तलाठी सज्जा भायगांव, ता.वैजापूर रा.वसंत काळे रा.भिवगांव ता.वैजापूर यांचे घरी भाडयाने असे सांगितले. त्यांना दोन्ही पंचासमक्ष मी दिलेल्या लाचेच्या रकमेबाबत विचारपुस करता त्यांनी त्यांचेकडील ग्रे कलरच्या लेडीज पर्समध्ये असल्याचे सांगितले त्यानंतर पंच क्र.2 सारीका पायगव्हाण यांचेकरवी त्या पर्समधील लाचेची रक्कम 2500/- रुपये काढुन घेऊन त्या नोटांवर तलाठी श्रीमती लंगडे मॅडम यांचे दोन्ही हातावर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहिला त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि विजय वगरे साहेबांनी त्यांची पुढील कार्यवाही करुन, तलाठी श्रीमती लंगडे मॅडम व लाचेच्या रकमेसह पो.स्टे.वैजापूर येथे आलोत.

तरी आज दि.21/04/2025 रोजी दुपारी 03.35 वा. आनंद हॉस्पीटल समोरील नाथकृपा किरणा दुकानाच्या बाजुने आतमध्ये हिरवी नेट असलेल्या श्री. वसंत काळे यांचे पश्चिममुखी घराचे पहिल्या मजल्यावर वैजापूर ता.

वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर येथे सौ.अमिता सुरेशराव लंगडे, वय 37 वर्ष, व्यवसाय- नोकरी तलाठी सज्जा भायगांव, ता.वैजापूर यांनी माझ्या आजोबाच्या नावे असलेल्या भायगांव शिवार शेत गट नं.16 मधील शेत जमीन ही माझ्यासह माझे चुलते रामदास देवराव ठोंबरे, कैलास देवराव ठोंबरे, माझी आई शकुंतला रघुनाथ ठोंबरे यांच्या नावाने वरील जमीन वारस हक्काने नावाची नोंद घेऊन 7/12 करुन देण्यासाठी 3,000/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती 2500/- स्वत: स्विकारण्याचे पंचासमक्ष मागणी करुन मागणी केलेली लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Shamsundar Ramchandra Kauthale(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमळनेर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Shamsundar Ramch
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI